निशाणी क्र. २४

## सरकारतर्फे साक्षीदार क्र. ५ (PW–5) यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

नाव – आत्माराम जानकीराम खैरे,

वय – ७३ वर्षे, व्यवसाय – राखण,

राहणार – नारायणपूर, तालुका नांदुरा, जिल्हा बुलढाणा

– – – – –

## सरतपास – सरकारी अभियोक्ता श्री.व्ही एम बापट यांच्यामार्फत

१. माझ्या घरात सध्या मी एकटाच राहतो. वर्षा ही माझी सून होती. ती वारली आहे. पाच सहा वर्षांपूर्वी वारली. माझ्यासोबत पूर्वी मुलगा, सून आणि त्यांची मुले राहत होती. मी बाहेर गेलो होतो. नातू आणि मी घरी आलो तेव्हा वर्षा घरात मरून पडली होती. त्या दोघा नवरा बायकोची सकाळी काहीतरी बोलचाल झाली होती. तिला तर काही झाले नव्हते. फक्त मरून पडली होती. असे काही घडले नाही की विष्णूने माझ्यासमोर वर्षाचे डोके आपटले आणि त्यामध्ये ती जखमी होऊन मरण पावली. नंदाबाई आमच्या घरापासून पाच–सहा घरे सोडून राहते. त्यादिवशी नंदाबाई माझ्याकडे आली नव्हती. पोलीस आमच्या घरी त्या दिवशी आले होते. पोलिसांनी वर्षाला नेले होते. ती मरून पडली होती म्हणून नेले होते. माझ्याकडे पोलिसांनी विचारपूस केले नव्हती. घटनेच्या चार–पाच दिवसानंतर पोलीस आले होते. तेव्हाही त्यांनी माझ्याकडे विचारपूस केली नव्हती.

(भारतीय पुरावा अधिनियम कलम १५४ मधील तरतुदीनुसार साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने उलट तपासात विचारता येतील असे प्रश्न विचारण्याची परवानगी शासकीय अभियोक्ता यांच्या विनंतीवरून देण्यात आली.)

२. हे खरे नाही की माझा मुलगा विष्णू हा त्याची पत्नी वर्षा हिला पाप लावून तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करायचा आणि तिला घराचे बाहेर जाऊ देत नव्हता. त्यामुळे वर्षा ही सुद्धा घराच्या बाहेर येत नव्हती व कोणासोबत जास्त बोलत नसे. आता मला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "अ" वाचून दाखविण्यात आला. तो खरा नाही. तो मी पोलिसांना सांगितलं नाही. तो पोलीस सोबत का आला ते मी सांगू शकत नाही.

३. हे खरे आहे की वर्षा ही समजूतदार होती आणि गरीब स्वभावाची होती. हे खरे आहे की तिचे आई–वडीलही गरीब होते. त्याचा पैशांचा काहीतरी लफडा होता. त्यामुळे वर्षा ही माहेरी जात नव्हती.

४. हे खरे नाही की वर्षा घरात असली तर मी घरात जात नसे कारण विष्णू हा मला सुद्धा मारहाण करायचा. विष्णू हा त्याच्या लहान लहान मुलांनाही मारहाण करत असे. हे खरे नाही की विष्णू कामावरून घरी आला की तो रोज वर्षा हिला मारहाण करायचा. हे खरं नाही की त्याने वर्षाचा हात एक–दोन वेळा मोडला ही होता. हे खरं आहे की वर्षा हिच्या किंकाळ्या ऐकून शेजारी नंदाबाई ढगे आणि

छायाबाई काटकर या येत असत आणि विष्णूला समजावून सांगत असत. आता मला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "ब" वाचून दाखविण्यात आला. तो खरा नाही. तो मी पोलिसांना सांगितलं नाही. तो पोलीस सोबत का आला ते मी सांगू शकत नाही.

५. हे खरे नाही की दिनांक २८/०५/२०२१ रोजी विष्णू हा कामावर जाण्याअगोदर कोणत्या तरी कारणावरून वर्षाला मारहाण करून कामावरून आल्यानंतर दाखवतो असे म्हटला होता. हे खरं नाही की दुपारी अंदाजे १२.०० ते १.०० च्या दरम्यान विष्णू हा कामावरून घरी आला तेव्हा वर्षा घरात झोपली होती. हे खरे नाही की तिने घराचा दरवाजा आतून बंद केला होता आणि दरवाजा बंद दिसल्याने विष्णू याने त्याच्या पत्नीला जोरजोरात वर्षे दरवाजा उघड असे म्हणून आवाज देत होता. हे खरे नाही की वर्षाने दरवाजा उघडला नसल्याने विष्णूने लाकडे दांड्याने दरवाजा ठोकणे सुरू केले. हे खरे नाही की विष्णूने माझ्या जवळून १३ महिन्याच्या मुलीला उचलून तिला मारून टाकतो असे म्हटल्याने वर्षाने घराचा दरवाजा उघडला. हे खरे नाही की दरवाजा उघडल्यानंतर विष्णू याने वर्षाला लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. हे खरं नाही की तुराट्याच्या खुंठल्यांनी खुंटले तुटेपर्यंत तिला मारले. हे खरे नाही की त्यानंतर लाकडी दांडा घेऊन सुद्धा त्याने तिला मारहाण केली. हे खरे नाही की मी त्यानंतर नंदाबाई ढगे यांच्या घरी गेलो आणि आमच्या घरी येण्याची तिला विनंती केली. हे खरे नाही की नंदाबाई यांनीही आमच्या घरी येऊन वर्षाला मारू नको अशी विनंती विष्णूला

केली. हे खरे नाही की विष्णूने तिलाही तुझ्या घरी जा असे म्हणून काढून दिले आणि वर्षाला मारहाण सुरू ठेवली. हे खरे नाही की वर्षाचे डोके लोखंडी पलंगाचे ठाण्यावर व खाली सिमेंटच्या गोळ्यावर जोरजोरात त्याने आपटले. हे खरं नाही की वर्षाने तिची मुले सार्थक आणि समर्थ यांना आवाज देऊन प्यायला पाणी मागितले तेव्हा विष्णूच्या धाकाने मुलांनी पाणी घेऊन जाण्याची हिंमत केली नाही. हे खरं नाही की थोड्यावेळाने मी मुलांना पाणी घेऊन पाठवले तेव्हा वर्षाने पाणी पिले नाही. हे खरे नाही की वर्षा त्यावेळी मरण पावली होती. हे खरे नाही की खोलीमध्ये सर्व रक्त साचले होते तेव्हा विष्णू यांनी मला टाक्यात पाणी भरायला सांगितले. हे खरं नाही की विष्णू यांनी पाण्याने वर्षा हिला खोलीतच पाणी टाकून धुतले आणि समोरील वसरीत आणून टाकले. हे खरं नाही की विष्णूने त्याच्या अंगातील कपड्यांनी सर्व खोली साफ करून घेतली त्यामुळे रक्त दिसत नव्हते. हे खरे नाही की विष्णू ने त्याच्या अंगात दुसरे कपडे घालून बाहेर येऊन म्हटले की वर्षा बोलू राहिली नाही त्यामुळे ऑटो रिक्षा घेऊन या. हे खरे नाही की वर्षाला दवाखान्यात घेऊन जाऊ असे तो म्हणाला. हे खरे नाही की नंतर मी त्याची माहिती पोलीस पाटील यांना दिली व तेव्हा पोलीस पाटील घरी आले होते. हे खरे नाही की पोलिसांनी विष्णू खैरे कोण आहे असे विचारले तेव्हा मी विष्णूकडे बोट दाखवले. हे खरं नाही की मी विष्णूचा भाऊ यालाही फोन लावून घटनेची माहिती दिली होती. आता मला पोलीस जबाबातील अधोरेखित भाग "क" वाचून दाखविण्यात आला. तो खरा नाही. तो मी पोलिसांना सांगितलं नाही. तो पोलीस सोबत का आला ते मी सांगू शकत नाही.

६. हे खरे आहे की पोलीस आले आणि विष्णूला घेऊन गेले होते. मला नांदुराच्या कोर्टात बोलावले होते. हे खरे नाही की तेथे न्यायाधीशांनी माझ्याकडे विचारपूस केली. बाई मरून पडली होती म्हणून विष्णूला पोलीस घेऊन गेले होते. (साक्षीदाराचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वय नोंदविण्यात आलेला जबाब **निशाणी क्रमांक २५/पी–३** वर आहे.). आज कोर्टात माझे दोन नातू आले होते पण त्यांना मला भेटू दिले नाही.

(भारतीय पुरावा अधिनियम कलम १५४ मधील तरतुदीनुसार साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने उलट तपासात विचारता येतील असे प्रश्न विचारण्याची परवानगी शासकीय अभियोक्ता यांच्या विनंतीवरून देण्यात आली.)

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांच्यामार्फत**

७. हे खरे आहे की विष्णू आणि त्याची पत्नी यांचा संसार घटनेपर्यंत व्यवस्थित सुरू होता. त्यांच्यामध्ये कोणताही वाद नव्हता. हे खरे आहे की दोघेही शेतमजुरी करून त्यांचा उदरनिर्वाह सुरळीत करत असत. हे खरे आहे की वर्षा हिने मजुरीचे उरलेले पैसे तिच्या भावाला दिले होते. हे खरे आहे की पैसे परत दिले नाहीत म्हणून त्यांच्यामध्ये वादही झाले होते. हे खरे आहे की त्यामुळे वर्षा ही तिच्या माहेरी जात नव्हती. हे खरे आहे की त्या वादामुळे वर्षा आणि तिच्या

माहेरचे संबंध खराब झाले होते. असे घडले होते की वर्षाच्या भावाने तिच्या घरी येऊन तिला शिवीगाळ करून धमकी दिली. हे खरे आहे की त्यामुळे वर्षा आणि विष्णू त्यांचा राग राग करत असे. हे खरे आहे की घटनेच्या दिवशी विष्णू शेतात गेला होता. हे खरे आहे की ती बाई मरून पडल्याचे पाहिल्यानंतर मी विष्णूला बोलावून घेतले होते. हे खरे आहे की ती बाई मरून पडल्याचे पाहूनही विष्णूला धक्का बसला होता. हे खरे आहे की वर्षाचा कोणीतरी घातपात केला. हे खरे आहे की पोलिसांनी त्याचा आरोप विष्णूवर ठेवला. हे खरे आहे की वर्षाच्या मृत्यूची विष्णूचा संबंध नाही. माझ्या नातवांना भेटण्यासाठी मी एकदा बुलढाण्याला गेलो होतो. हे खरे आहे की माझ्या नातवापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे. माझ्या घरून पोलिसांनी काही जप्त केले नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.01 18:44:17 +0530

मलकापूर.
दिनांक – ०१/०३/२०२५.

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले.

(साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत १७.०० वाजता सुरु करुन १७.५० वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.01 18:44:11 +0530

मलकापूर.
दिनांक – ०१/०३/२०२५.

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |